# महाराष्ट्र राज्य हज समिती

(अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिनस्त)
मोहम्मद हाजी साबू सिद्दीक मुसाफिरखाना, खोली क्र.6 व 7, एल.टी. मार्ग, मुंबई

के एच जी २०२० /प्र.क्र.२/एसएचसी/बी-८३ दि.२४/०१/२०२०

प्रति,

**अपर मुख्य सचिव,**
अल्पसंख्यांक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२..

विषय: हज- २०२० करिता खादिमुल हुज्जाजची निवड करण्याबाबत.
संदर्भ: मुख्य कार्यकारी अधिकारी, केंद्रीय हज समिती, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.८, एचसी-१८/१६८/२०१९/४६९२ दिनांक २२ जानेवारी, २०२०.

महोदय,

संदर्भाधिन परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे कृपया पहावी.

२. हज २०२० करिता राज्य शासनातर्फे पाठवावयाच्या खादिमुल हुज्जाज यांची निवड महाराष्ट्र राज्य हज समिती मार्फत करावयाची आहे. यास्तव राज्य शासनाच्या सर्व विभागांतर्गत कार्यरत असलेल्या पात्र व इच्छूक मुस्लिम स्त्री व पुरुष उमेदवारांना (वर्ग १ व त्यावरील अधिकारी वगळून सर्व अधिकारी व कर्मचारी) त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत योग्य मार्गाने नाहरकत प्रमाणपत्रासह विहित नमुन्यातील (परिशिष्ट) अर्ज सादर करावे. सदर अर्ज www.hajcommittee.gov.in या वेबसाईटवर **दि.२२.०१.२०२०** पासून ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध आहे. ऑनलाईन पध्दतीने पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह महाराष्ट्र राज्य हज समितीच्या उपरोल्लेखित कार्यालयात **दि.१० फेब्रुवारी, २०२०** पर्यंत निश्चितपणे पोहचतील अशा बेताने पाठविण्याकरिता सर्व विभागांना आपल्या मार्फत पाठविण्यात यावे तसेच सदर पत्र (सहपत्रासह) अल्पसंख्यांक विकास विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

३. खादिमुल हुज्जाज म्हणून सेवा पार पाडण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या आधिन राहून उमेदवाराची शिफारस महाराष्ट्र राज्य हज समितीकडे करण्यात यावी.

१. उमेदवारांकडे दि.२३ डिसेंबर,२०१९ या दिवशी किंवा या पूर्वी काढलेला आणि किमान दि.२०/०१/२०२१ पर्यंत वैधता असलेले पारपत्र (पासपोर्ट) आवश्यक राहील.
२. पुरुष / स्त्री अर्जदार ज्यांचे दि.३१.०५.२०२० रोजी वय २५-५८ वर्ष पूर्ण होणे आवश्यक आहे.
३. सी.जी.आय. जेद्दा येथे हज सेवक (खादिमुल हुज्जाज) म्हणून सन २०१९ मध्ये प्रतिनियुक्तीने गेलेल्यांचा विचार करण्यात येणार नाही.
४.सी.जी.आय. जेद्दा येथे हज सेवक (खादिमुल हुज्जाज) म्हणून तीन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा प्रतिनियुक्तीने गेलेल्यांच विचार करण्यात येणार नाही.
५.अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना केंद्रीय हज समिती / महाराष्ट्र राज्य हज समितीमार्फत त्या प्रित्यर्थ आयोजित केले जाणाऱ्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे अनिवार्य राहील. प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्यास निवड रद्द करण्यात येईल.
६. उमेदवाराने यापूर्वी हज किंवा उमरा केलेले असावे. हज केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

७. अरबी भाषेचे ज्ञान असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

८. उमेदवाराचे आरोग्य उत्तम असावे. **उमेदवाराने शासकीय दवाखान्यातूनच मिळवलेले वैद्यकीय प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल**. उमेदवार हृदय रोगी, उच्च रक्तदाब, मधुमेह, अस्थमा, क्षय रोगी आणि किडनी विकार ग्रस्त मुक्त असावेत. तसेच त्यांना सार्वजनिक कार्यक्रम व्यवस्थापनाचा अनुभव असावा.

९. खादिमुल हुज्जाज म्हणून निवड होण्याकरिता कोणताही राजकीय दबाव आण्ण्यात येवू नये तसे आढळून आल्यास त्या उमेदवाराची निवड प्रक्रिया थांबविण्यात येईल.

१०. उमेदवाराची निवड प्रकिया राबविताना त्यांचे शिक्षण व संगणकीय ज्ञानाचा विचार करून प्राधान्य देण्यात येईल.

११.उमेदवाराची निवड प्रक्रीया राबविताना या पूर्वी हज सेवक म्हणून न गेलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

१२. उमेदवाराने त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे नाहरकत प्रमाणपत्र व इतर मुळ आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३. चूकीची माहिती सादर करून निवड झाल्यास उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे, विहित ऑनलाईन नसलेले, अपूर्ण तसेच योग्य मार्गाने सादर न करण्यात आलेले व संबंधित कार्यालयाच्या नाहरकत प्रमाण पत्राशिवाय प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची जाणीव कृपया सर्व संबंधितांना करून देण्यात यावी, ही विनंती.

महाराष्ट्र राज्य हज समिती मुंबई

**( इम्तियाज काझी )**
कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई

सहपत्र: वरीलप्रमाणे.

प्रत, सहपत्रासह आवश्यक त्या कार्यवाहीस्तव,

सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी / सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद